# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Deccan Herald 01-03-2016**



Bollywood music composers and singers Vishal-Shekhar performing at 'Aura-16' cultural programme organised by KLS GIT in Belagavi on Sunday. DH PHOTO

# Bollywood music duo enthrall audience

**BELAGAVI:** Bollywood music directors duo and singing sensations Vishal-Shekhar (Vishal Dadlani and Shekhar Rajivani) enthralled and entertained the audience and youth in particular during live concert at 'Aura-16' a national level cultural fest organised by KLS Gogte Institute of Technology (GIT) on Sunday.

GIT through its annual event 'Aura' has been providing one of the biggest platforms for the students across the nation to come together and showcase their multifaceted talent and rise to the tallest fame. It's one of the most happening and popular cultural events of Karnataka. Aura-16 had multiple cultural events within it like dance, literary events, music fine arts, dramatics and many more. GIT team won the general championship while KLES Jawaharlal Nehru Medical College team was runners-up in the event.

Audio-visual presentation titled 'best day of my life' on GIT featuring the faculty and students was appreciated by the audience.

Another presentation on the earlier events held at Aura too recalled memories of the past for the students, faculty and management.

Vishal-Shekar who commenced their live concert with composition 'Bachano-e-Hasino' kept the audience on their toes for about three hours with their action packed live performances.

They performed songs like Madari Madari, Manwa Lage, Zehnaseeb, Tu Meri, Balam Pichkari, Bin Tere, Salaam Namaste, Aankon Me Teri and many more.

Solo and duets performed by the Bollywood music composers and singers duo kept the audience spell bounded and dance to the beats of the songs.

**Heavy rush**

Students and youth in particular present for the event made the most of the performance by performing dances in the public arena and many times almost forcing themselves on the barricade that separated the stage from the public area.

KLS Chairman M R Kulkarni, Secretary A K Tagare, GIT Governing Council Chairman U N Kalkundrikar, KLS Management Member R S Mutalik-Desai, Principal A S Deshpande and other dignitaries were present.

**DH News Service**

# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Sakaal 01-03-2016**

# ऑरा महोत्सवातील संगीतात रसिक चिंब

## विशाल-शेखर जोडीवर तरुणाई झाली फिदा : सर्वांनाच नृत्य करण्यास भाग पाडले

सकाळ वृत्तसेवा





बेळगाव : जीआयटी ऑरा महोत्सवात विशाल आणि शेखर संगीत सादर करताना. दुसऱ्या छायाचित्रात महाविद्यालयीन युवती संगीतात दंग झाल्या होत्या.

बेळगाव, ता. २९ : 'आ.. मिल जा गले, हस्ते हस्ते सलामे नमस्ते' गाण्याच्या तालावर भांगडा स्टेप घालावयास लावणाऱ्या प्रसिद्ध गायक विशाल-शेखरच्या जोडीने 'ऑरा-२०१६'च्या कार्यक्रमात तरुणाईसह सर्वांना नृत्य करण्यास भाग पाडले. रविवारची सायंकाळ 'ऑरा'च्या निमित्ताने रसिक वर्ग चिंब झाला.

गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (जीआयटी) ऑरा-२०१६ महोत्सवाच्या निमित्ताने रविवारी सायंकाळी जीआयटीच्या मैदानावर विशाल-शेखर यांचा लाइव्ह शो आयोजित केला होता. यंदाचे ऑरा महोत्सवाचे जनरल चॅम्पियनशिप जीआयटीला मिळाले. रनरअपचा मान जेएनएमसीला मिळाला. संस्थेचे संचालक एम. आर. कुलकर्णी, यू. एन. कालकुंद्रीकर, प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे यांच्या उपस्थितीत विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. यानंतर विशाल-शेखर यांचा कार्यक्रम सुरू झाला. 'बचना ए हसिनो.. लो मै आ गया' गाण्याच्या तालावर सर्वांना थिरकण्यास लावून स्टेजवर दोघांनीही एंट्री मारली. विद्यार्थ्यांनी मोबाइलवरील एलईडी लाईटस् लावून त्यांचे स्टेजवर अनोखे स्वागत केले.

स्टेजच्या समोर विद्यार्थ्यांना नाचण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र, अनेक महाविद्यालयीन युवक आणि युवतींची पावले प्रेक्षकांच्या मागे असलेल्या रिकाम्या जागेतही थिरकत होती. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच स्टेजसमोर विद्यार्थी नाचू लागल्याने व्हीआयपी सीटवर बसलेल्यांना कार्यक्रमाचा आनंद लुटणे अवघड ठरले. त्यामुळे पोलिसांच्या मदतीने महाविद्यालयीन युवकांना हटविण्याचा प्रयत्न सुरू होता. यास काहींनी आक्षेपही घेतला. त्यामुळे अखेर पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन स्टेजवरून करण्यात आले. विशाल-शेखर स्टेजवर येताच त्यांनी पुन्हा स्टेजसमोर नाचण्याचे सर्वांना आवाहन केल्याने तरुणाईला उधाण आले. केवळ गाणी ऐकत बसण्यापेक्षा त्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी खुर्च्यांवरून उठून नाचण्याचे या दोघाही कलाकारांनी आवाहन केल्याने व्हीआयपींसह सर्वच खुर्च्यांवरील प्रेक्षक उठून त्यांच्या गाण्याला साद देत होते. अनुचित घटना टाळण्यासाठी प्रथमच या ठिकाणी ड्रोनचा वापर करण्यात आला.